**प्रेसनोट** **दि.१४/०३/२०१९**

## सिंहगडरोड पोलीस ठाणे,पुणे शहर

## कोर्ट कामकाज पाहणारे कर्मचारी यांनी केलेली उत्कृष्ट कामगिरी

---

मा.जिल्हा व सत्र न्यायाधिश, शिवाजीनगर, पुणे कोर्टातील सेशन केस नं. १६३/२०१५ भा.दं.वि. कलम ३०२,३४ मधील आरोपी नामे गणेश नारायण रेणुसे, वय २२ वर्षे, रा. हिंगणे खुर्द, आबा पाटील बंगल्याशेजारी, सिंहगडरोड, पुणे हा आरोपी दिले पत्त्यावर राहत नसल्यामुळे मा. हुजुर कोर्टाने त्यास एन.बी.डब्ल्यु. वॉरंट बजावणी करणेबाबत प्राप्त झाले होते. सदर आरोपी हा दिले पत्त्यावर राहत नसल्याने तसेच कोठे राहतो याबाबत काहीएक माहिती मिळत नसल्याने त्यास सदर एन.बी.डब्ल्यु. वॉरंटची बजावणी करता आली नाही. त्याची सिंहगडरोड पोलीस स्टेशन कोर्ट कामकाज पाहणारे पोलीस हवालदार ३९५० ज्ञानोबा महानवर यांनी त्यांचे बातमीदारांमार्फत माहिती काढुन तो मु.पो. राजंणे खामगाव, ता. वेल्हा, जि. पुणे या ठिकाणी राहत असल्याची माहिती मिळाल्याने पोलीस हवालदार ५३४७ सुधिर सोनवणे व पोलीस हवालदार ४४२४ खंडु कवडे यांना पाठवुन सदर आरोपीचा शोध घेवुन तो मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्यास सिंहगडरोड पोलीस स्टेशन येथे आणुन आज दि. १४/०३/२०१९ रोजी १८.१५ वा. अटक करुन त्यास विश्रामबाग पोलीस स्टेशनचे लॉकअपमध्ये ठेवण्यात आले आहे. त्यास उदया दि. १५/०३/२०१९ रोजी मा. न्यायालयामध्ये हजर करण्याची तजवीज ठेवली आहे.